|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/२५१४/२०२० दिनांक:०२/१०/२०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय :- दि.१ ऑक्टोबर २०२० पासून सुरू होणाऱ्या उन्हाळी २०२० च्या पदविका,पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या / अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या नियमित व बॅकलॉगसह विषयांच्या लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षांबाबत.**

**संदर्भ** :- (१) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २०१/२०२०, जा.क्र.कबचौउमवि/७-अ /परीक्षा / २२८३ /२०२०, दिनांक १० सप्टेंबर, २०२०

(२) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ/२४७७/२०२०, दिनांक: २९/०९/२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भांकित (२) वर नमूद पत्रान्वये विद्यापीठातील सर्व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी संघटनांनी दि.२४ सप्टेंबर,२०२० पासून लेखणी बंद आंदोलन सुरू केल्यामुळे परीक्षा नियोजित वेळेत सुरू करणे व सुरळितपणे पार पाडणे शक्य होणार नसल्यामुळे मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दि.१ ऑक्टोबर,२०२० पासून सुरू होणाऱ्या विद्यापीठ प्रशाळा/विभाग आणि संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थामधील विषयांकित सर्व लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याबाबत कळविण्यात आले होते.

या पत्रान्वये कळविण्यात येते की, आता, कर्मचारी संघटनांचे आंदोलन दि.१ ऑक्टोबर,२०२० रोजी स्थगित करण्यात आल्यामुळे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्यापीठ प्रशाळा आणि विभागातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उन्हाळी २०२० च्या पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या नियमित व बॅकलॉगसह विषयांच्या पुढे ढकलण्यात आलेल्या लेखी परीक्षांचे आयोजन आता दि.१२ ऑक्टोबर,२०२० पासून करण्यात येणार आहे. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे., याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर बाब सर्व विद्यार्थी व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव.**

जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि,जळगाव :

कृपया, वरील पत्रातील आशय बातमी रुपाने वर्तमानपत्रात प्रसिध्दीबाबत कार्यवाही करावी.